# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/अरिहंत विहार हौ./क.७७(अ)/ १८ /१८
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. पालघर
दिनांक :- ०८/०२/२०१८

वाचले :- १) श्री. राजकुमारी टंडन यांचेकडील दिनांक १४/१०/२०१६, १५/०२/२०१७ रोजीचे तक्रार अर्ज.
२) या कार्यालयाकडील दिनांक २८/११/२०१६, १६/१२/२०१६ व ०६/०५/२०१७ रोजीचे पत्र.
३) श्रीमती राजकुमारी टंडन यांचे दिनांक १६/०५/२०१७ व ०७/११/२०१७ रोजीचे पत्र.
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील कारणे दाखवा नोटीस दि. ०७/१२/२०१७
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, अरिहंत विहार को.ऑप. हौसिंग सोसा. लि. प्लॉट नं.२३, नवघर, आनंद नगर, वसई रोड, वसई (प) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या सभासद श्रीमती राजकुमारी टंडन, सदनिका क्र.१०३ यांनी वाचावे क्र. १ नूसार या कार्यालयात तक्रारी दाखल केल्या होत्या. त्याअनुषंगाने उक्त वाचावे क्र.२ नूसार संस्थेस तक्रारीतील मुद्यांवर खुलासा सादर करण्यासाठी कळविण्यात आले होते. संस्थेने याबाबत खुलासा सादर केला होता. याप्रकरणी या कार्यालयात दि. ०२/०२/२०१७, १५/०२/२०१७, ०२/०३/२०१७, १५/०३/२०१७, २३/०३/२०१७ रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. सुनावणी अंती तक्रारदार यांना उक्त वाचावे क्र.३ नूसार उत्तर कळविण्यात आले व त्या उत्तराच्या पत्राची प्रत संस्थेस पृष्ठांकीत करुन योग्य त्या सूचना देण्यात आल्या. सदर सूचनांप्रमाणे संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडलेली व्यवस्थापन समिती अवैद्य असल्यचे कळवून सदरची निवडणूक घेण्याकरीता राज्यस्तरावर मा. राज्य सहकारी निवडणूक प्राकिरण, म.रा. पुणे या प्राधिकरणाची स्थापना झाली असल्याने सदर प्राधिकरणामार्फत सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणे अपेक्षित आहे. सबब निवडणूकीसाठी आवश्यक ते पत्रव्यवहार या कार्यालयाशी करावा असे सूचित करण्यात आले होते. आणि,

ज्याअर्थी, तक्रारदार श्रीमती राजकुमारी टंडन यांचे ॲड. श्रीमती साधना धुरी यांचे दि. १६/०५/२०१७ रोजीचे पत्र व त्यांचे दि. ०७/११/२०१७ रोजीचे शासनास लिहीलेले पत्रानूसार संस्थेने या कार्यालयाकडील दि. ०६/०५/२०१७ रोजीच्या पत्रातील सूचनांचे अनुपालन न करता दि.१७/००९/२०१७ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेवून ८ सदस्यांची व्यवस्थापन समिती निवडण्यात आलेली आहे. सदरची निवडणूक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७३(क)(ब) व पोटकलम ११ मधील तरतूदीनूसार अनुसरुन मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म. रा. पुणे यांचमार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था(समितीचे निवडणूक) नियम २०१४ मधील तरतूदीनूसार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वैद्य व्यवस्थापक समिती अस्तित्वात नाही. आणि,

ज्याअर्थी संस्थेवर सद्यस्थितीत अवैद्य समिती कार्यरत आहे त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविणेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यांत येवू नये? याचा खुलासा या कार्यालयास प्रत्यक्ष दि. २१/१२/२०१७ रोजी उपस्थित राहून करावा असे कळविण्यात आले होते व त्यास अनुसरुन दि. २१/१२/२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी संस्थेच्यावतीने चेअरमन- सौ. शैलजा पी. कदम, सेक्रेटरी- सौ. इंद्रावती गुप्ता, खजिनदार- सौ. नुतन मुन्सी व श्री. सुहास कदम- सदस्य व तक्रारदार श्रीमती राजकुमार टंडन उपस्थित होते. संस्थेच्या चेअरमन यांनी सद्याची व्यवस्थापक कमिटीची निवड दि. १७/०९/२०१७ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आली आहे असे म्हणणे मांडले. सहकारी संस्थाच्या निवडणूका हया राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडून घेतल्या जात असून त्यांच्याकडून नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत संस्थेची व्यवस्थापक समितीची निवडणूक घेणे आवश्यक होते. सबब संस्थेने घेतलेली निवडणूक कायदेशीर नसल्याचे दिसून येते.

Scanned by CamScanner

त्याअर्थी, सभासदांच्या व्यापक हिताचा दृष्टीकोन ठेवनू संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त असल्याचे माझे स्पष्ट मत झाले आहे. यास्तव खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)ब(१) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, डॉ.अशोक कुंभार, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई, अरिहंत विहार को.ऑप. हौसिंग सोसा. लि. प्लॉट नं.२३, नवघर, आनंद नगर, वसई रोड, वसई (प) ता.वसई जि.पालघर या संस्थेवर श्रीमती तृप्ती शशिकांत साळुंखे, प्रमाणित लेखापरिक्षक, पॅनल क्र.१८७७८, फ्लॅट नं. २१८, दुसरा मजला, रॉयल शॉपिंग सेंटर, अंबाडी रोड, वसई(प.) यांची प्राधिकृत अधिकारी नियुक्त करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. ०८/०२/२०१८ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई
वसई तालुका वसई

( डॉ.अशोक कुंभार )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रति,
१. श्रीमती तृप्ती शशिकांत साळुंखे, प्रमाणित लेखापरिक्षक, पॅनल क्र.१८७७८, फ्लॅट नं. २१८, दुसरा मजला, रॉयल शॉपिंग सेंटर, अंबाडी रोड, वसई(प.) प्राधिकृत अधिकारी अरिहंत विहार को.ऑप. हौसिंग सोसा. लि. प्लॉट नं.२३, नवघर, आनंद नगर, वसई रोड, वसई (प) ता.वसई जि.पालघर
२. अध्यक्ष/सचिव, अरिहंत विहार को.ऑप. हौसिंग सोसा. लि. प्लॉट नं.२३, नवघर, आनंद नगर, वसई रोड, वसई (प) ता.वसई जि.पालघर
२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- वसई रोड

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पालघर.

For Prajakta Salunkhe

Scanned by CamScanner